RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेत महात्मा गांधीं यांचे योगदान आणि त्यांचे विचार

**प्रा. विकास वसराम आडे**
राज्यशास्त्र विभाग
सी.जे. पटेल महाविद्यालय, तिरोडा
मो. ९७६४१७६७८३.
Email- vikasade603@gmail.com

**प्रा. डॉ. राजेंद्र ओंकार बेलोकार**
राज्यशास्त्र विभाग
एस. एन. मोर कला, वाणिज्य
आणि विज्ञान महाविद्यालय, तुमसर
जिल्हा भंडारा.

---

**विषय प्रवेश :**

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय हा भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेत महात्मा गांधीं यांचे योगदान व विचार हा असून या शोध निबंधात महात्मा गांधीजींचे भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेत योगदान व विचार यावर प्रकाश टाकण्यात येईल.

दोनशे वर्षे ब्रिटिश सत्तेच्या साम्राज्यवादी धोरणाखाली दडपल्या गेलेल्या भारतीयांना निर्भय बनवून त्यांच्यातील नैतिक शक्ती व आत्मविश्वास जागृत करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढण्याकरिता अनेक जाती, धर्म, पंथ व वर्गामध्ये फाटाफुट झालेल्या भारतीयांना स्वातंत्र्याच्या झेंड्याखाली करणारे, राष्ट्रांच्या स्वातंत्र्यलचे नेतृत्व यशस्वीपणे करून राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देणारे व संपूर्ण विश्वात राष्ट्रपिता म्हणून गोरविले गेलेले, केवळ भारतीयांनाच नव्हे तर संपूर्ण विश्वाला सत्य, अहिंसा, साधगी, सदाचार व परोपकर या मूल्यांचा संदेश देऊन मानवी कल्याणाचा मार्ग दाखविणारे महान सामाजिक व मानवतावादी संत म्हणून महात्मा गांधींचे नाव हे पूर्ण विश्वात अजरामर झालेले आहे.

कोणतेही विचार आणि तत्वज्ञान ही परिस्थिती सापेक्ष असतात. विचार आणि तत्त्वज्ञान त्या परिस्थितीचे अपत्य असतात. भारत भूमीमध्ये अनेक युग पुरुषांचा जन्म झाला. व त्यांनी परिस्थितीनुरूप विचारांची मांडणी केली. काळ व परिस्थितीनुसार विचारांचे महत्त्व कमी होत जातात. त्यांचा प्रभाव हा कमी होतो, परंतु समकालीन परिस्थितीचे अवलोकन जर केले तर महात्मा गांधीजींची विचार आणि तत्वज्ञान हे आजच्या बदलत्या परिस्थितीत सुद्धा उपयुक्त ठरतात. भारतात पूर्वीपासूनच अनेक जाती, धर्म, पंथ, वर्ग व गटाचे अस्तित्व असून ब्रिटिशाविरुद्ध लढण्यासाठी एकजूट होण्याची गरज होती. म्हणून महात्मा गांधीजींनी सत्याग्रह एवढेच महत्व राष्ट्रीय एकात्मतेला दिले. ब्रिटिश पूर्व काळात व ब्रिटिश काळात भारतीय समाज हा कधीच एकजूट नव्हता. म्हणून मोघलांना आठशे वर्ष व ब्रिटिशांना दोनशे वर्ष भारतावर राज्य करता आले. विविध धर्म, जाती, भाषा, पंथ, वर्ग, व विविध संस्थानांमध्ये भारत हा विभागलेला होता. प्रत्येक गटांचे हित व अस्मिता होती. धर्म, भाषा, जाती आणि वाढती आर्थिक विषमता यांनी विभागलेल्या भारतीय समाजामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे प्रयत्न अनेक समाजसुधारकांनी केला, परंतु यश आले नाही. महात्मा गांधीजींनी अनेक जाती-धर्मामध्ये, पंथांमध्ये फाटाफूट झालेल्या भारतीय समाजाला राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्याच्या दृष्टीने आपल्या विधायक

कार्यक्रमाची आखणी केली व स्वातंत्र्य आंदोलनाची रणसिंग फुकले.

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी यांनी आपल्या विचारांची आणि तत्त्वज्ञानाची मांडणी केवळ राजकीय नाही तर मानवतावादी दृष्टिकोनातून केली आहे. आजच्या सामाजिक राजकीय आर्थिक परिस्थितीकडे बघितले असता असे दिसून येते की, आज मानवी जीवनाला भेडसावणाऱ्या अनेक समस्या ह्या डोके वर काढत आहेत. त्यामध्ये जातीयवाद, भाषावाद, प्रांतवाद, नक्षलवाद, दहशतवाद आर्थिक विषमता, आंदोलनाची बदलते हिंसक स्वरूप गरिबी-बेरोजगारी, वाढते गुन्हेगारीकरण यासारख्या समस्यांनी मावियतेसमोर प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे. अलीकडील काळात तर राजकारणाचे स्वरूप हे दिवसेंदिवस बदलत चाललेले आहे राजकारण आणि जात, राजकारण आणि धर्म, राजकारण आणि भाषा, राजकारणान आणि प्रांतवाद असे राजकारणाचे समीकरण झाले असून यामुळे सर्वत्र मानवी जीवना धोक्यात येत आहे.

आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्ष पूर्ण झाले असून भारतीय संविधानामध्ये १९७६ साली. ४२ वी घटनादुरुस्ती करून धर्मनिरपेक्षता, समाजवाद, सार्वभौमत्व, राष्ट्रीय एकात्मता या मूल्यांचा समावेश उद्देश पत्रिकेत करण्यात आला. परंतु आजही भारतीय लोकांच्या मनामध्ये धर्मनिरपेक्षतेची व राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजलेली दिसत नाही. आजही भारतामध्ये अनेक जाती, धर्म, पंथ, वर्गाचे लोक राहत असून प्रत्येक जाती व गटाचे हित व अस्मिता आहेत जर प्रत्येक व्यक्तीने स्वहित व स्वार्थ यांचा त्याग करून राष्ट्रीय हितामध्ये आपले हित मानले तर राष्ट्रीय एकात्मतेसमोर आज दहशतवाद, नक्षलवाद, प्रादेशिकतावाद, क्षेत्रियतावाद, सांप्रदायवाद, भ्रष्टाचार, आर्थिक विषमता, स्त्री हिंसाचार व बालकामगारांच्या समस्या यांचे निर्मूलन करून एकात्म व एकसंघ भारत निर्माण होऊ शकतो. तो भारत म्हणजे महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत होय. आज राष्ट्रीय एकात्मतेवर विचार करण्याची गरज भासत आहे. आज भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोर अनेक आव्हाने उभी झालेली आहेत. त्यांचे निर्मूलन करण्यासाठी आजही महात्मा गांधीजींचे विचार प्रासंगिक व उपयुक्त ठरतात.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील युग प्रवर्तक क्रियाशील नेतृत्व व तत्वचिंतकांच्या मालिकेत महात्मा गांधीजी यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. सत्याग्रहाची प्रनेते स्वातंत्र्यलढ्याचे सैनानी, समाज सुधारक व मानवतावादी संत अहिंसेचे पुजारी समाज सुधारक आणि धर्मनिती यांच्या ऐक्य भावाचा पाठपुरावा करणारे आधुनिक संत म्हणून त्यांची ख्याती सर्वदूर आहे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ही अनेक विविध अंगे कोणत्या अतूट धाग्याने एकत्र गुंफली गेली होती त्याचा शोध घेतल्या खेरीज १९२० ते १९४७ या कालखंडातील राजकीय व सामाजिक घडामोडीवर त्यांचा व्यापक प्रमाणात प्रभाव पडला होता. हे लक्ष वेधी आहे.

**अभ्यासाचा उद्देश :**

1. भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेत महात्मा गांधीजींचे योगदान आढावा घेणे.
2. राष्ट्रीय एकात्मता आणि गांधीजींचे विचार यांचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निंबधासाठी माहिती संकलन आणि विश्लेषण पद्धतीचा अवलंब करण्यात येईल, शोध निंबधाच्या विषयाशी संबंधित द्वितीय माहिती स्रोताचा वापर करण्यात येईल ज्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्र, विशेषांक, विविध वर्तमानपत्रातील लेख, साप्ताहिक इत्यादींच्या आधारे हा शोधनिबंध तयार करण्यात येईल.

**संशोधन साहित्याचा आढावा :**

**१. महात्मा गांधीजीचे विचार :**

संकलन आणि सांपादन आर. के. प्रभू आणि यू. आर. राव अनुवादक - ब्रिजमोहन हेडा नवजीवन मुद्रनालय अहमदाबाद- या ग्रंथामध्ये लेखकांनी सत्य व, निर्भयता, श्रद्धा, सत्याग्रह, अपरिग्रह, सर्वोदय, विश्वस्तता, स्वातंत्र्य आणि लोकशाही, स्वदेशी या संकल्पनांचा समावेश केला असून त्याचा प्रस्तुत शोध निबंधासाठी उपयोग करण्यात आला आहे.

**२. गांधी :**

नलिनी पंडित ग्रंथाली प्रकाशन नेहरूनगर मुंबई पहिली आवृत्ती,1986. संपूर्ण मानव जातीला सत्यवाणीचे संदेश देणारे महात्मा गांधी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक प्रमुख नेते होते. अनेक जाती,धर्म, पंथ, व वर्गामध्ये विभागलेल्या भारतीय समुदायाला एकत्र आणून स्वतंत्र भारताचे स्वप्न पूर्ण करणारे महात्मा गांधी हे अस्मरणीय व्यक्तिमत्व होते गेल्या सतर अंशी वर्षात जे राजकीय सामाजिक परिवर्तन घडवून आले त्याला गांधींची नेतृत्व व कार्य यांचा फार मोठा हातभार लागलेला आहे महात्मा गांधीजींचे विचार व व्यक्तिमत्त्वाची जडणघडण सत्यनिष्ठा विश्वधर्म गांधी आणि भारतीय राजकारण सत्याग्रह तत्वज्ञान व कार्यपद्धती राष्ट्रीय सामाजिक न्याय, विकेंद्रित अर्थव्यवस्था यासंबंधी गांधीजींचे विचार व तत्वज्ञान याविषयी नलिनी पंडित यांनी विश्लेषणात्मक अध्ययन करून विचारांची मांडणी केली आहे.

**३. राष्ट्रपिता महात्मा गांधी- ना**. रा. अभ्यंकर :

मौजे प्रिंटिंग ब्युरो खटाववाडी गिरगाव मुंबई. पहिली आवृत्ती, 1971. ना. रा. अभ्यंकर यांनी महात्मा गांधी पूर्व भारतातील सामाजिक व राजकीय परिस्थिती टिळकांची स्वराज्याची मागणी व भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे स्वरूप गांधीजींचे भारतात आगमन व भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे बदलते स्वरूप याविषयी सखोल विचारांची मांडणी केली आहे.

**४. काँग्रेसने आणि गांधीजींनी अखंड भारत का नाकारला? :**

राजहंस प्रकाशन सदाशिव पेठ पुणे 2014. लेखक डॉ. शेषराव मोरे यांनी या ग्रंथामध्ये भारतीय स्वातंत्र्य आंदोलन सत्तांतर, 1940 मुस्लिम लीग व फाळणीची मागणी, मुघल का मुस्लिम बहुसंख्या १८५७ नंतर भारतात ब्रिटिश सतीचा पाया व हिंदू मुस्लिम राजकीय संघर्ष, आंदोलन विश्व इस्लाम वाद व राष्ट्रबाह्यनिष्ठा, 1935 नंतर

झिनांची हिंदू मुस्लिम प्रश्न विषयक भूमिका याविषयी या ग्रंथात डॉ. शेषराव मोरे यांनी महत्त्वपूर्ण मांडणी केली असून त्याचा या संशोधन कार्यासाठी उपयोग करण्यात येईल.

५. **महात्मा गांधी आणि भारतीय संविधान** :

राजहंस प्रकाशन सदाशिव पेठ पुणे- 2013. लेखक नरेंद्र चपळगावकर यांनी सारखा व खादी, स्वावलंबनाची प्रतीके, गांधींच्या आयुष्यातील शेवटचे तीन वर्ष व भारतीय राज्यघटनेची निर्मिती, ग्रामपंचायत ची स्थापना व विकेंद्रीत अर्थव्यवस्था, महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाची जडणघडण, स्वातंत्र्य व घटना यांच्यासाठी संघर्ष, स्वातंत्र्याची तयारी व घटना समितीच्या निवडणुका, गांधी विचारातील राज्यघटना याविषयी सविस्तर विचारांची मांडणी केली असून त्या साहित्यांचा या शोधन निबंधासाठी उपयोग करता येईल.

६. **गंगेमध्ये गगन वितळले** :

राजहंस प्रकाशन सदाशिव पेठ पुणे- लेखक अंबरीश मिश्र यांनी 'गंगेमध्ये गगन वितळले' या ग्रंथात गांधीजींचे व्यक्तिमत्व व गांधी महामानव होते. माणूस जोडण्याची अपूर्व कला गांधीकडे होती. अफाट संघटन कौशल्य सत्य व अहिंसेचे उपासक कृतिशील गांधी इत्यादी. दृष्टिकोनातून गांधी रेखाटला आहे. या ग्रंथाचे एकूण आठ भागात विभाजन करण्यात आले असून शोध कार्यात हा ग्रंथ महत्त्वाचा मार्गदर्शक ठरतो.

७. **एकविसाव्या शतकातील गांधी** :

परधाम प्रकाशन, पवनार वर्धा. २०१० लेखक वासंती सारे यांनी 'एकविसाव्या शतकातील गांधी' या आपल्या ग्रंथात एकविसाव्या शतकात गांधी विचारांची प्रासंगिकता स्पष्ट केली आहे. त्यासाठी १८ प्रकरणात त्यांचे विभाजन केले आहे त्यामध्ये संकट जागतिकीकरणाचे उत्तर गांधीच. गांधी तत्त्वज्ञान सर्वोदय, अहिंसा, गांधीजींची जीवनपद्धती आणि २१ व्या शतकात तिची उपयुक्तता सत्याग्रहाचा जन्म व विकास, गांधी एक अर्थशास्त्रज्ञ गांधीजी व आर्थिक प्रगती, शोषण मुक्त समाजासाठी खादी, जीवन शिक्षण पद्धती स्त्रीमुक्ती आणि गांधीजी इत्यादी. गांधी विचारावरील लेख लिहून पुस्तक रूपात संपादन केले आहे. त्याचा या संशोधन कार्यासाठी निश्चितच उपयोग होईल.

८. **राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना** :

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे विभिन्न जाती, धर्म, पंथ, वर्ग व भाषा यात विभागलेला आहे. तसेच अनेक समूहात व गटात विभागलेला जोअसून प्रत्येक समूह गटांचे आपापले हितसंबंध आहेत जेव्हा या सर्व गटांमध्ये व समूहांमध्ये स्वार्थी वृत्तीचा त्याग होऊन सामूहिक विकासाला चालना मिळते तेव्हा राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते. राष्ट्रीय एकात्मतेसाठी ही आवश्यक आहे की, सर्व समूहामध्ये चसर्व बाबतीत समानता असावी व त्यासाठी राष्ट्रपती दृढनिष्ठा असावी लागते. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे राष्ट्रातील सर्व लोकांमध्ये एक व्यापक राष्ट्रनिष्ठ निर्माण करणे, राष्ट्रीय हित हे जाती, धर्म, पंथ, वर्ग, वंश, भाषा व क्षेत्र यापेक्षा श्रेष्ठ असावे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे व्यक्तिगत हित व राष्ट्रहित यात समन्वय स्थापन करणे होय.

भारताच्या इतिहासाकडे थोडे मागे वळून पाहिले असता असे दिसून येते की, प्राचीन काळापासून भारतात विविध धर्म, पंत, वंश, भाषा व संस्कृतीचे लोक राहत आले आहेत. भारत हा विविध प्रांतांमध्ये विभागलेला होता. याचाच फायदा घेऊन सांस्कृतिक दृष्ट्या एकात्म असलेल्या देशावर परकीय सत्तेने अनेक स्वाऱ्या करून भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेला तडा दिला. उदा. मोघल, डच, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज इत्यादी. तरी, सुद्धा भारतीय जनतेत फूट पडली नाही. स्वातंत्र्यापूर्वीही एकात्मतेची व राष्ट्रीयत्वाची भावना ज्वलंत होती. ती भंग करण्याचा प्रयत्न अनेक परकीय सत्तेने केला परंतु ज्यांना ते साधले नाही ते इंग्रजांनी साधले त्यांनी आपली राजकीय सत्ता स्थापन करून 'फोडा व झोळा' या नीतीचा अवलंब केला व भारतीय जनतेची विभिन्न जाती, धर्म व गटामध्ये विभाजन केले. व संप्रदायवाद जातिवाद सारखी अनेक आव्हाने निर्माण झाली. याचे महत्त्वपूर्ण उदा. म्हणजे भारत-पाकिस्तान फाळणीचे बिजारोपण करून ब्रिटिशांनी सांप्रदायवादाची पेरणी केली. त्याचे पडसाद बिहारमधील नौवाखाली येथील हिंदू मुस्लिम दंगलीमध्ये उमटले येथे फार मोठ्या प्रमाणात हिंदूंची कत्तल करण्यात आली. तरी सुद्धा ब्रिटिश सत्तेच्या दमनकारी धोरणापुढे न झुकता भारतीय जनतेच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेत महात्मा गांधीजींनी खंड पडू दिला नाही.

भारतीय राजकारणात अलीकडील काळात राष्ट्रीय एकात्मता हा महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला आहे. वास्तविक राष्ट्रीय एकात्मता ही काही नवीन संकल्पना नाही स्वातंत्र्यापूर्वी भारतीय जनतेच्या मनात राष्ट्रीय एकात्मतेची भावना रुजलेली होती. ब्रिटिश भारतात भारतीय जनता राष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकत्र आली होती. दीडशे वर्षे सत्ता गाजवणारा ब्रिटिश सत्तेच्या विरोधात महात्मा गांधीजींनी अनेक जाती, धर्म, भाषा व वर्गात विभागलेल्या भारतीय जनतेला एकतेच्या सूत्रात बांधून राष्ट्रीय आंदोलनाचे रूपांतर जण आंदोलनात करून दिले. राष्ट्रभिमान, राष्ट्रसेवा, राष्ट्रप्रेम या भावनेने संपूर्ण देश एकात्म झाला. महात्मा गांधीजींनी विभिन्न जाती धर्मातील लोकांना एकत्र करून ब्रिटिश सत्तेच्या विरोधात सत्य व अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करून असयोग आंदोलनाची रणशिंगे पुकारून अखंड भारताच्या निर्मितीला सुरुवात केली.

**भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेत महात्मा गांधीं यांचे योगदान आणि त्यांचे विचार :**

**१. हिंदू मुस्लिम ऐक्य :**

महात्मा गांधीजींनी तत्कालीन युरोप प्रणित राष्ट्रवाद या संकल्पनेला विरोध केला व 'हिंद स्वराज्य' मधून स्वातंत्र्य सामाजिक बांधिलकी संमिश्र संस्कृती व मानवतावादी तत्त्वांचा पुरस्कार केला. आणि हिंदू मुस्लिम एक संघ राष्ट्रवादाची समर्थक मांडणी केली. मुस्लिम, ख्रिश्चन समाजाचे हित जोपासणे म्हणजे हिंदू विरोधी कृत्य हे यास त्यांनी विरोध केला. महात्मा गांधीजींनी हिंदू मुस्लिम ऐक्या विषयी विचारांची मांडणी, संस्कृतिक वार्षिक संदर्भातून केलेली आहे. हिंदू, जैन धर्म ही वेगवेगळे पंथ आहेत म्हणून ते काय एक राष्ट्र होऊ शकत नाही. मुस्लिम समाजातील बहुसंख्य जनता ही पूर्वीची हिंदू धर्मातून धर्मांतरित असून आपले व त्यांचे पूर्वज एकच आहेत. आपण सर्वजण एकाच रक्ताची आहोत. आचरण पद्धती बदलली म्हणजे राष्ट्राचा भाग नाही असे गांधी म्हणतात. हिंदुस्तान हिंदूचाच आहे? असे हिंदूने मानल्यास ते एक स्वप्न आहे. तसेच मुसलमान समजू लागल्यास तेही स्वप्न समजावे, महात्मा गांधीजी म्हणतात की, हिंदू-मुस्लिम एक असून त्यांच्यात एकतेची राष्ट्रीयत्वाची

भावना आहे ब्रिटिश साम्राज्याच्या अगोदर हिंदू मुस्लिम यांच्यात अस्तित्वाची एकात्मतेची भावना नव्हती. हिंदुस्थानात राष्ट्रवादाची भावना रेल्वे, दळणवळण साधने इ. ब्रिटिश सुधारणांनी झाली यास महात्मा गांधी विरोध करतात. साम्राज्य स्थिरतेसाठी हिंदू मुस्लिम ऐक्य अस्थिर करण्यास धर्मांध राजकीय विचार नेतृत्वाला प्रोत्साहन देण्यास ब्रिटिशांनी सुरुवात केली, अशी टीका महात्मा गांधींनी केली आहे. संपूर्ण देश स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभागी असताना हिंदू मुस्लिम बळी जाऊ लागले त्यांच्यातील दरी रुंदावत जाऊ लागली ऐक्य ऐक्याला तडे जाऊ लागले. १९४७ साली भारत-पाकिस्तान ही स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाली. गांधींचे एक स्वप्न स्वातंत्र्याच्या रुपात साकार झाले तरी गांधी संतुष्ट नव्हते कारण फाळणीने एकात्म भारताचे स्वप्न भंगले होते. महात्मा गांधी स्वातंत्र्याच्या जल्लोषात सहभागी न होता भारत पाकिस्तान फाळणीने उदभवलेल्या नोआखाली येथील हिंदू मुस्लिम दंगल शमविण्यासाठी प्रयत्न करीत होते. महात्मा गांधीजींनी हिंदू-मुस्लिम समाजात राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागण्यासाठी अथक प्रयत्न केले. महात्मा गांधींचे विचार मुस्लिम धर्माबाबत बालपणापासूनच सहिष्णुवृत्तीचे होते. मुस्लिम धर्मियांचे मन व विचार, भावना समजून घेण्यासाठी त्यांनी कुराण शरियतीच्या कायद्यांचा सखोल अभ्यास केला. निरनिराळ्या धर्मातील लोक एक दुसऱ्या बाबत सहिष्णुता ठेवतील तर त्यांच्यातील आपसापसातील मतभेद व धर्मभेद विसरून आपल्या राजकीय हक्कासाठी एकत्र येऊ शकतात. याचा प्रत्यय महात्मा गांधीजींना आला होता. खिलाफत चळवळी बाबत मुस्लिम बांधवांच्या असलेल्या भावना समजावून घेऊन मुस्लिम समाजाला सहानुभूती दाखल्यास त्यांच्या लढायला साम्राज्यविरोधी वळण मिळेल आणि मग त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घ्यायला वेळ लागणार नाही. अशी महात्मा गांधीजींची धारणा होती.

**२. धार्मिक ऐक्य** :

महात्मा गांधीजींचे धर्मविषयक विचार हे व्यवहारिक, वास्तववादी होते. म्हणजे धर्मातून समाजाचे दैनंदिन प्रश्न सुटायला हवेत असे त्यांचे मत होते. धर्माचे कोणतेही तत्व विवेकाच्या विरोधात जाणारे असेल किंवा नैतिकतेशी संघर्ष करणारे असेल तर या तत्वाला गांधीजींचा नकार होता. गांधीजी सर्वधर्म समभाव मानणारे होते. महात्मा गांधीजींनी व्यक्ती आणि समाज जीवनामध्ये धर्माला आधारभूत तत्त्व मानले आहे. महात्मा गांधीजींनी धर्माची व्याख्या करत असताना म्हटले आहे की, धर्म म्हणजे परंपरागत धर्म नसून, तो धर्म आहे जो सर्व धर्मांचा मूळ आहे. जो आपल्याला ईश्वराचा साक्षात्कार करण्यास मदत करतो. महात्मा गांधीजींनी धर्माचा अर्थ सांप्रदायवाद असा सांगितलं नसून त्यांचा धर्म हिंदू इस्लाम आणि ख्रिश्चन इ. पासून वेगळा आहे. महात्मा गांधींचा धर्म हा मानवतावादी आहे. त्यांचे प्रमुख लक्ष मानव सेवा आहे. म्हणून गांधीजी नेहमी म्हणत 'जनसेवा हीच ईश्वर सेवा आहे'. गांधीजींच्या मते, धर्माचे प्रमुख तत्त्व सत्य, प्रेम आणि अहिंसा आहे. महात्मा गांधीजींनी आपल्या धर्मविषयक विचाराला विज्ञानाची जोड दिली होती. विज्ञान हे रूढी, अंधविश्वास, प्रथा-परंपरेचा विरोध करते गांधीजी म्हणतात, मी कोणत्याही एका धर्माच्या सिद्धांताचा स्वीकार करत नाही, जे बुद्धीला पटणार नाही व नैतिकतेच्या विरोधी आहे, अशा कोणत्याही धर्माला व ग्रंथाला बुद्धीवर हवी होऊ देत नाही. महात्मा गांधीजींचे धर्म विषयक विचार हे सहअस्तित्व, सहिष्णुतेवर आधारित होते. त्यांचा सर्व धर्मांच्या तत्त्वावर विश्वास होता. गांधीजींच्या मते, जगातील कोणताही धर्म दुसऱ्या धर्मापेक्षा श्रेष्ठ असल्याचा दावा करू शकत नाही. सर्व धर्म समान आहेत. एकाच ध्येयाकडे जाण्याचे वेगवेगळे मार्ग आहे. पण आज धर्माची जागा सांप्रदायवाद व

मूलतत्त्ववादानी घेतली असून प्रत्येक धर्मातील व्यक्ती हा एकमेकांच्या धर्माच्या श्रेष्ठतेवरून वाद निर्माण करत आहे. आज सांप्रदायवाद मोठ्या प्रमाणात वाढलेला असून अनेक धार्मिक दंगे घडत आहेत ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेसमोर प्रश्नचिन्ह निर्माण झालेला आहे. विविध जाती धर्म व पंथांमध्ये महात्मा गांधीजी प्रणित मानवतावादी धर्मविषयक विचारांची बिजे रुजली तर भारतामध्ये राष्ट्रीय एकात्मतेसमोर असणाऱ्या सांप्रदायवादासारख्या समस्यांचा निर्मूलन होऊ शकते.

**३. ग्राम स्वराज्यातून एकात्मता** :

महात्मा गांधींच्या विकासाच्या दृष्टिकोनाचे प्राथमिक लक्ष गाव होते कारण महात्मा गांधीजी म्हणत की, 'राष्ट्राची पुनर्बांधणी ग्रामीण भागाच्या पुनर्बांधणीवर अवलंबून असते त्याने त्यांच्या अनुभवांच्या आधारे ग्रामीण भागाच्या पुनर्बांधणीसाठी त्यांनी आर्थिक विचार मांडले. त्यापैकी १९१७ मध्ये चंपारण, १९२० मध्ये सेवाग्राम, १९३८ मध्ये वर्धा येथे ग्रामीण पुनर्बांधणीचा प्रयोग आणि रचनात्मक कार्यक्रम हे अशा उपक्रमाचे प्रमुख उदाहरण होते. शिवाय त्याने त्यांच्या ग्रामीण पुनर्बांधणीच्या कल्पना मांडल्या आणि त्यांच्या अनुयायांना आणि सहकार्यांना ग्रामीण पुनर्बांधणीवर लक्ष केंद्रित करण्याची आव्हान केले. १३नोव्हेंबर १९४५ रोजी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना दिलेल्या पत्रात त्यांनी प्रत्येक व्यक्तीचा मानसिक आर्थिक, राजकीय आणि नैतिक विकास समान हक्क आणि संधी मिळावी यासाठी सुचवले होते, ग्रामीण व शहरी भागातील दरीत कमी करण्यावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले.' महात्मा गांधीजींच्या मते देशाच्या विकासासाठी ग्राम (खेडी) यांचा विकास महत्वपूर्ण आहे. प्रत्येक गाव स्वावलंबी बनली तर सहकार्य हा त्यांचा आधार राहील, गावातील लोक शांतीपूर्ण व गौरवशाली जीवन व्यतीत करतील प्रत्येक भागात पंचायत राहील अहिंसात्मक समाजाची स्थापना गावातच शक्य आहे. 'Society based on non-violence can only be group Settled in village in which voluntary co-operation is the condition of dignified and peaceful existence.'

महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्य हे नैतिक मूल्यावर आधारित होते. संपत्तीच्या संचयापेक्षा नैतिक मूल्यांना अधिक महत्त्व मिळाले पाहिजे. गांधीजींनी विकेंद्रीत आर्थिक व्यवस्थेच्या दृष्टीकोनाचा प्रतिकार केला जिथे उत्पादनाचे प्रमुख क्षेत्र गाव पातळीवर होते, जी मूलभूत मानवी गरजा पूर्ण करण्यासाठी आणि स्वदेशी साधन संसाधनांचा वापर करण्यासाठी केंद्रित होते. गांधीजींच्या ग्राम स्वराज्याचे प्राथमिक लक्ष अर्थपूर्ण रोजगारांमध्ये व्यक्तीचे सक्षमीकरण करणे, बेरोजगारी, बेकारी, दारिद्र्य, यांचे निर्मूलन करून स्वदेशीवर लक्ष केंद्रित करणे, त्यांनी प्रत्येक गावाला सर्व वस्तूंचे उत्पादन करण्यास सांगितले नाही तर बेरोजगारी दूर करण्यासाठी मुख्य क्षमतेवर काम करण्यावर त्यांचा भर होता. महात्मा गांधीजींनी ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडून भारतीय जनसमुदायांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत करून त्यांना राष्ट्रीय आंदोलनामध्ये सहभाग करून सहभागी करून घेतले. आज देशामध्ये सर्वत्र दिसून येणारी गरिबी, बेरोजगारी, दारिद्र्य कुपोषण, आरोग्याच्या समस्या या राष्ट्रीय एकात्मतेसमोर आव्हान म्हणून डोके वर काढत आहे या समस्यांचे निर्मूलन गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेतील विचारामुळे होऊ शकते. आजही महात्मा गांधींचे विचार प्रसंगीक व उपयुक्त आहेत.

### ४. विश्वस्त वृत्तीचा सिद्धांत आणि राष्ट्रीय एकात्मता :

महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानातील महत्त्वाचे तत्वज्ञान म्हणजे विश्वस्त वृत्तीचाप् सिद्धांत आहे. महात्मा गांधींच्या मते, 'श्रीमंतांनी त्यांच्या मालमत्तेला देवाने गरिबांच्या फायद्यासाठी व्यवस्थापित करण्यासाठी सोपवलेले मानले पाहिजे' प्रत्येक व्यक्ती जवळ आपल्या गरजांची पूर्तता होईल एवढीच संपत्ती असली पाहिजे. उपजीके व्यतिरिक्त संपत्ती ही समाजाचा एक ट्रस्टी म्हणून गरिबांवर खर्च करावी. तेव्हाच आर्थिक समता प्रस्थापित होऊ शकतो गांधीजींच्या मते, आज भारतीय समाज व्यवस्थेकडे बघितले असता असे दिसून येते की, सर्वत्र वाढणारी बेकारी, बेरोजगारी, दारिद्र्य, कुपोषण, वाढते गुन्हेगारीकरण, हिंसाचार या सर्व समस्यांच्या मागे आर्थिक विषमता आहे. जर आर्थिक विषमता नष्ट झाली नाही तर या समस्यांचे रूपांतर आव्हानांत होऊ शकते, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेसमोर एक प्रश्नचिन्ह निर्माण होते. समाजामध्ये असणारी गरीब श्रीमंत दरी याचे निर्मूलन करायचे असेल तर, प्रत्येक व्यक्तीने समाजाचा एक विश्वस्त म्हणून अतिरिक्त संपत्ती ही समाजावर खर्च करावी. ज्यामुळे समाजामध्ये असणारी आर्थिक विषमतेची दरी कमी होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना जण सामान्यांच्या मनामध्ये रुजेल.

### ५. आत्मनिर्भर भारत व राष्ट्रीय एकात्मता :

महात्मा गांधींच्या मते, श्रमप्रतिष्ठा ही समाजसुधारणेसाठी खूप महत्त्वाची आहे, कारण यामुळे समाजात समानता आणि न्याय प्रस्थापित होऊ शकतो.

महात्मा गांधींनी आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर जोर दिला होता, आणि त्यांच्या मते, श्रमप्रतिष्ठा आत्मनिर्भरतेसाठी आवश्यक आहे. महात्मा गांधींच्या विचारांनुसार, श्रमप्रतिष्ठा ही मानवी जीवनात खूप महत्त्वाची आहे. त्यांनी श्रम आणि स्वावलंबनाला खूप महत्त्व दिले, आणि त्यांच्या विचारांनी आजही लोकांना प्रेरणा देत आहेत.

आत्मनिर्भर झालेला भारतच जगाच्या कल्याणासाठी ठामपणे उभा राहू शकतो. महात्मा गांधी म्हणतात, "युरोपच्या चरणासमोर झुकलेला भारत मानवतेकरिता आशेचा कोणताही किरण दाखवू शकत नाही. जागृत आणि स्वतंत्र भारतच कण्हत असलेल्या जगाला शांतीचा आणि सद्भावनेचा संदेश देऊ शकेल." महात्मा गांधींच्या मांडणीत युरोपचा उल्लेख केला असला, तरी ही गोष्ट आज संपूर्ण जगाला लागू आहे आणि ती गोष्ट म्हणजे भारताने आत्मनिर्भर होऊन जगाला मार्गदर्शन करणे. भारताचे परमवैभव हा विश्वकल्याणाचा मार्ग आहे. जगातील अनेक देशांना भारत आधार ठरू शकतो, त्यासाठी आधी भारताने आत्मनिर्भर झाले पाहिजे.

महात्मा गांधींचे काही विचार आचरणात आणावे लागतील. त्यातील पहिली गोष्ट आहे श्रमप्रतिष्ठा. कोणतेही काम हलक्या दर्जाचे नाही ही गोष्टी आपण व्यवहारातून सिद्ध केली पाहिजे. महात्मा गांधी म्हणतात, "आपल्या देशातील घोर दारिद्र्य आणि बेरोजगारी पाहून मी अक्षरशः रडलो आहे. महात्मा गांधी यांच्या जीवनात आपणास अनेक चिरंतन मूल्ये आढळतात. या मूल्यांना त्यांनी व्यवहाराची जोड दिली. या मूल्यांमुळेच त्यांच्या जगण्याला अर्थ प्राप्त झाला असून या मूल्यांबाबत त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. उलट ही मूल्ये जगण्यासाठी ते कर्मठपणे वागत होते, असेच आपल्या लक्षात येईल. साधी राहणी, उपभोगावर नियंत्रण, संयमाचे

पालन, साधनशुचिता, साध्य-साधनविवेक, स्वदेशी, ग्रामस्वराज्य, प्रत्येक हाताला काम, श्रमप्रतिष्ठा, नैतिक शिक्षणाचा आग्रह, या सर्व गोष्टी महात्मा गांधींशी जोडलेल्या असल्या, तरी त्या शाश्वत आहेत. शाश्वत मूल्ये ही प्रत्येक कालखंडात वेगवेगळ्या स्वरूपात पुढे येत असतात. हा कालखंड आत्मनिर्भर भारत होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचा आहे.

आत्मनिर्भर होणे म्हणजे काय? तर आपली दुर्बळता झटकून उत्साहाने भारित होऊन स्वत: ला सिद्ध करणे होय. आपल्या सुप्त शक्तीला जागृत करून सामर्थ्याचे प्रकटीकरण करणे होय. महात्मा गांधी म्हणतात, "भारत दुर्बळ आहे म्हणून मी त्याला अहिंसेच्या मार्गावर चालण्याची विनंती करत नाही. माझी इच्छा आहे की त्याने आपल्या सामर्थ्याची आणि शक्तीची जाणीव ठेवून अहिंसेचे अनुसरण केले पाहिजे. मला वाटते की, प्रत्येक भौतिक दुर्बलतेवर मात करू शकणाऱ्या व संपूर्ण भौतिक सामर्थ्याला आव्हान देऊ शकणाऱ्या आपल्या अविनाशी आत्म्याची ओळख भारताला पटावी." महात्मा गांधी यांचे हे विचार १९२० सालचे, म्हणजे शंभर वर्षांपूर्वीचे आहेत, पण आजही ते प्रासंगिक उपयुक्त आहेत.

**६. अहिंसेतून राष्ट्रीय एकात्मता** :

महात्मा गांधीजींनी अहिंसे संदर्भात केवळ तत्त्वज्ञानाची मांडणीच केली नाही तर, दैनंदिन आचरणामध्ये त्यांनी अहिंसेचा स्वीकार केला.१९२० ते १९४७ पर्यंत महात्मा गांधींनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जे आंदोलन उभे केले त्याचे स्वरूप अहिंसक होते व अहिंसेचा वापर करून त्याने ब्रिटिश साम्राज्यशाहीला सह दिला नाही तर भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. अहिंसेचा असा अभिनय मार्ग महात्मा गांधींनी जगाला दिला धर्म किंवा अध्यात्माच्या क्षेत्रात असलेली सत्य व अहिंसा ही दोन मूल्य गांधीजींनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात वापरली आणि अन्यायाच्या प्रतिकारासाठी त्यांचा यशस्वी प्रयोग केला. गांधीजींच्या मते, अहिंसा हे असे मूल्य आहे, ज्याचे सामूहिक पातळीवर सह अनुष्ठान शक्य आहे. अहिंसा हे अन्याय निवारणाचे प्रभावी साधन आहे. अहिंसेला सामूहिक सत्याग्रहाचे रूप देऊन स्वराज्य प्राप्ती, समाज परिवर्तन विश्वशांती इत्यादी. क्षेत्रात अहिंसेला क्रांतिकारी शक्ती बनविण्याचे अभूतपूर्वक कार्य महात्मा गांधीजींनी केले. आज मात्र राजकीय व सामाजिक क्षेत्रात लोक आपल्यावरील अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी हिंसेचा आधार घेतात हिंसक आंदोलने करणे, राष्ट्रीय संपत्तीची हानी करणे, सार्वजनिक मालमत्तेची नाशदूष करणे, इ. त्यामुळे देशातील शांतता भंग होते. गांधीजींनी अन्यायाच्या प्रतिकार करण्यासाठी अहिंसेची व सत्याग्रहाचे शस्त्र दिली. ज्याद्वारे आपल्या मागण्या सनदशीर पद्धतीने आपणास मान्य करून घेता येतात परंतु मागील काही दशकांमधील परिस्थितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, भारतामध्ये अनेक जातीय, धार्मिक आणि सांप्रिक दंगली झाल्या असून त्याने हिंसेचे रूप धारण केले आहे ते राष्ट्रीय एकात्मतेसमोर एक आव्हान ठरत आहे. अहिंसा तत्त्वज्ञानाचा स्वीकार व्यक्तिगत जीवनामध्ये प्रत्येक व्यक्तीने केला तरी गांधींच्या स्वप्नातील अहिंसक समाज व एकात्म भारत निर्माण होईल.

**निष्कर्ष** :

१९२० ते १९४७ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड गांधीयुग म्हणून ओळखले जाते. महात्मा गांधीजींनी अनेक जाती, धर्म, पंथ व वर्गामध्ये फाटा फूट झालेल्या भारतीय समाजाला स्वातंत्र्य आंदोलनाच्या

झेंड्याखाली एकत्र आणले व एकात्म व एकसंघ भारताचे स्वप्न साकार केले. भारतीयांना अभिमान वाटावे असे उत्तुंग व सर्वांगीण विकासाच्या घटकाला छेद देणारे गांधीजींचे व्यक्तिमत्व केवळ भारतीयांनाच नाही तर संपूर्ण विश्वाला भुरळ पाडणारे असे, सहिष्णुवादी, मानवतावादी व्यक्तिमत्व गांधीजींचे होते. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाने केवळ भारतीयांनाच नाही तर, पाश्चात्य देशातील मार्टिन ल्युथर किंग नेल्सन मंडेला, बराक ओबामा यांचा व्यक्ती विकासावर गांधीजींच्या तत्वज्ञांची विलक्षण प्रभाव पडल्याचे दिसून येतो, महात्मा गांधींच्या स्वप्नातील सुदृढ व बलशाली, सर्वोदयी, समाजवादी भारत पहावयाचा असेल तर आज भारतात राष्ट्रीय एकात्मतेसमोर निर्माण झालेल्या समस्यांच्या जोगडातून भारताला सोडविणे अगत्याचे व अपरिहार्य आहे. सद्यस्थितीत राष्ट्रीय एकात्मतेसमोर निर्माण झालेल्या समस्यांकडे दृष्टिक्षेप टाकले असता गांधीजींचे सातत्याने स्मरण होते.

आज राष्ट्रीय एकात्मता टिकण्यासाठी व शोधण्यासाठी आम्हाला विचार करावा लागत आहे याचे कारण असे की, राष्ट्रीय एकात्मता आमच्यात राहिलेली नाही, या देशातील जनता मनाने एकमेकापासून दूर गेलेली आहे असे दिसून येते, भारतात सांप्रदायवाद, जातीयवाद, सीमावाद, प्रादेशिकवाद, अंतर्गत संघर्ष चालू आहे. काही राज्यात तर नक्षलवादाने हिंसाचाराचे थैमान घातले आहे. तसेच पाणी वाटपाचे व भाषा संबंधीच्या प्रश्नाने उग्ररूप धारण केले आहे आणि दहशतवाद ही एक जागतिक समस्या बनली आहे. आम्ही आमच्या पूर्तेच व आमच्या राज्यापुरते विचार करीत आहोत. आमची वृत्ती संकुचित होत चाललेली आहे. आलीकडच्या काळात तर धार्मिकता व जातीयता डोकेवर काढीत आहे यामुळे सर्वत्र धार्मिक व जातीय दंगली होऊ लागल्या आहेत. या समस्यांनी भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे जर अखंड एकात्म भारत निर्माण करावयाचे असेल तर सर्व समस्यांचे नराकरण करणे आवश्यक आहे आणि हे केवळ महात्मा गांधींच्या अहिंसा तत्त्वज्ञानामुळे होऊ शकते.

**संदर्भ :**


- पाटील, एसएच (१९८३). गांधी आणि स्वराज. नवी दिल्ली: डीप अँड डीप पब्लिकेशन्स.
- प्रभू, आरके, आणि राव, यूआर (1960). महात्मा गांधींचे मन: गांधीच्या विचारांचा विश्वकोश. अहमदाबाद: नवजीवन मुद्रालय.
- डॉ. भा. ल भोळे 'आधुनिक भारतातील राजकीय विचार' पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर.
- ना. रा अभयंकर राष्ट्रपिता 'महात्मा गांधी' प्रकाशक केशव भिकाजी ढवळे श्री समर्थ सदर पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई.
- नरेंद्र चपळगावकर 'महात्मा गांधी आणि भारतीय राज्यघटना' राजहंस प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे.
- डॉ. अनिलकुमार भाटे, 'मानवतावाद 'निवृत्त प्राध्यापक, विद्युत अभियांत्रिकी, संगणक विज्ञान,
- माहिती तंत्रविज्ञान आणि मॅनेजमेण्ट एडिसन शहर, न्यू जर्सी राज्य, अमेरिका.
- शेषराव मोरे 'काँग्रेसने आणि गांधीजींनी अखंड भारत का नाकारला? राजहंस प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे.

- वि. भि. कोलते 'एक राष्ट्र एक समाज' -साहित्य सुद्धा भाग तीन- नागपूर विद्यापीठ प्रकाशन
- १०. नलिनी पंडित ' गांधी' ग्रंथाली प्रकाशन मुंबई.
- ११. डॉ. उर्मिला शर्मा व डॉ. एस.के. शर्मा 'भारतीय राष्ट्रीय आंदोलन'-अटलांटिक प्रकाशन नई दिल्ली.
- गोपीनाथ कालभोर 'धर्मनिरपेक्षता और राष्ट्रीय एकात्मता' ज्योती प्रकाशन जयपुर.
- डॉ. सदानंद मोरे 'लोकमान्य ते महात्मा'- राजहंस प्रकाशन पुणे.
- गोखले द.न. 'गांधीजी मानव नि- महामानव' मौजे प्रकाशन, खटवाडी गिरगाव मुंबई.
- रामचंद्र गुहा 'गांधी नंतरचा भारत' मॅजेस्टिक पब्लिक हाऊस मुंबई.
- शेषराव मोरे 'मुस्लिम मनाचा शोध' राजहंस प्रकाशन पुणे.
- नरहर कुरुंदकर 'जागर'-देशमुख आणि कंपनी प्रकाशन, पुणे.
- तारकुंडे व्ही. एम रॅडिकल ह्युमॅनिझम, मुलगामी मानवतावाद. (अनु) कर्णिक व्दा. भ. श्री. विद्या प्रकाशन.
- डॉ. वर्मा व्ही. पी 'दि पोलिटिकल फिलॉसॉफी ऑफ महात्मा गांधी अँड सर्वोदय' लक्ष्मीनारायण आगरवाल, आग्रा.
- मुर थॉमस युटोपिया इन आयडीयल एमपायार्स अँड रिपब्लिकस वॉशिंग्टन अँड लंडन, १९०९.